**नि.दि.दा.क्र.८८/२०१७**
**दत्तात्रय वि. मारुती व इतर**
**नि. क्र. ५० पुढे सुरु**

नि.क्र.८४ वरील आदेशानुसार साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु
**<u>प्रतिवादी क्र.१ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री यु.एच.सणस</u>**

२७. हे म्हणणे खरे आहे की, गट नंबर २०८८ ला मालक व वहीवाट सदरी प्रतिवादी क्र. १ ची नोंद आहे. सदरची नोंद किती साली झाली हे मला सांगता येत नाही. मी सदरील मिळकतीच्या सातबारा उताराला प्रतिवादी क्र. १ च्या नावाने फळझाडांची नोंद असलेचे पाहिले नाही. तसेच त्या मिळकतीवर त्यांनी कर्ज घेतल्याची नोंद असल्याचा उतारादेखील मी पाहिला नाही. सन १९९३ साली सदरची मिळकत प्रतिवादी क्र. १ च्या वडीलांनी तिस दिलेबाबत अभिलेख मी पाहिलेला नाही. त्या मिळकतीच्या उताराला प्रतिवादी क्र. १ च्या नावाची नोंद कशी झाली त्याबाबतचा कागदोपत्री उतारा मी दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी कथित मृत्यूपत्र झाले त्यावेळी सदरील मिळकतीच्या उता-याला मारुती गार्डे यांच्या नावाची नोंद नव्हती. आता मला निशाणी क्र. ५७ वरील मृत्यूपत्रासह संलग्न असलेला गट क्र. २०८८ चा सातबारा उतारा दाखविला हे म्हणणे खरे आहे की, त्यावर कुठेही मारुती रामा गार्डे यांच्या नावाची नोंद दिसून येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या उतारात प्रतिवादी क्र. १ च्या नावाची नोंद ४ आणे हिस्साकरीता आहे. कथित मृत्यूपत्राच्या वेळी माझ्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. १ व तिचे वडील यांच्यात वाटप झाले होते.

२८. प्रतिवादी क्र. १ व मारुती गार्डे यांच्यात प्रथम कोणत्या साली दावा दाखल झाला याबाबत मला सांगता येत नाही. सदरील दाव्यात गट क्र. २०८८ या मिळकतीच्या ४ आणे हिश्श्यात प्रतिवादी क्र. १ यांची वहिवाट व ताबा असलेचे माननीय न्यायालयाने निष्कर्श नोंदविल्याचे मला माहित नाही. मारुती रामा गार्डे यांनी त्या दाव्यातील निर्णयाविरुध्द मा. जिल्हा न्यायालयात अपील दाखल केलेचे मला माहित आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यात व अपीलात माझे वडील कामकाज बघायचे. आता मला निशाणी क्र.५७ वरील मृत्युपत्रात शेवटच्या तीन ओळींमध्ये मारुती रामा गार्डे यांनी सही व अंगठा केल्याचा उल्लेख

आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या मृत्यूपत्र तरीही मारुती गार्डे यांचा अंगठा कुठेही दिसून येत नाही. माझ्या जबाबात त्याबाबत स्पष्टीकरण देण्यात आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरील कथित मृत्यूपत्रात सातारा हे शब्द खोडून त्यापुढे वाई असे लिहीले आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे सातारा आणि वाई असे दोन्हीही शब्द तेथे नमूद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे सदरील मृत्यूपत्रात सातारा आणि वाई असे दोन्ही ठिकाणी झाल्याचे त्यात नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण माझ्या जबाबात नाही. हे म्हणणे खरे आहे की, मृत्यूपत्रात शेवटच्या पानावर पेनाने तारीख नमूद आहे, व उर्वरीत मजकूर टाईप केलेला आहे. मृत्यूपत्रात पहिल्या व शेवटच्या पानावर पेनाने तारीख का नमूद केली याचे स्पष्टीकरण मी माझ्या जबाबात दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथित मृत्यूपत्रवर ज्या ज्या ठिकाणी खाडाखोड आहे तसेच ज्या ज्या ठिकाणी पेनाने मजकूर लिहीला आहे त्याकरीता स्वतंत्र सही दिसून येत नाही. तसेच त्या संदर्भात कोणतेही स्पष्टीकरण माझ्या जबाबात दिले नाही. मी माझ्या घरी असलेले मूळ मृत्यूपत्र अभिलेखावर दाखल करणार आहे.

२९. गट क्र. २०६५ च्या व्यवहाराबाबत प्रतिवादी क्र. १ ची लेखी संमती घेतलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्या खरेदीखतात सदरची मिळकत घरखर्चाकरीता व लोकांची देणी देण्याकरीता विकली असा उल्लेख आहे. तो उल्लेख बरोबर अथवा चूक असलेबाबत मला सांगता येत नाही. मला गट क्र. २०६५ बाबत कथित मृत्यूपत्रात काय मजकूर लिहिला आहे त्याबाबत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरील मृत्यूपत्रासह कोणकोणती कागदपत्रे जोडली याविषयी मला सांगता येणार नाही, कारण मी ती प्रत्यक्ष पाहिली नाही. आम्ही गट क्र. २०६५ बाबत आजपर्यंत वाटपाचा कुठलाही दावा दाखल केला नाही. माझे वडील सन २०१४ मध्ये मृत्यू पावले. मला स्पेशल दिवाणी दावा क्र. ४०/२०१७ बाबत माहिती नाही. त्या दाव्यात मी व माझा भाऊ दिलीप प्रतिवादी क्र. ४ व ५ असल्याचे व आम्हाला त्या दाव्याचे दावा समन्स प्राप्त झाल्याचे मला सांगता येणार

नाही. तसेच त्यात मारुती गार्डे मृत्यू पावल्यानंतर आमची नावे वादी म्हणून सामील व्हावी याकरीता मी अर्ज दिल्याचे व तो नामंजूर झाल्याचे मला सांगता येणार नाही. सदरील स्पेशल दिवाणी दावा क्र. ४०/२०१७ अद्यापही प्रलंबित आहे.

३०. कथित मृत्यूपत्राबाबत माहिती मिळाल्यानंतर आम्हा प्रतिवादींनी प्रतिवादी क्र. १ विरुध्द त्याअनुषंगाने वाटपाचा दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कायदेशीर परिस्थिती लक्षात घेता कथित मृत्यूपत्रामध्ये नमूद असलेल्या मिळकतींमध्ये मारुती गार्डे यांचा निम्मा हिस्सा व प्रतिवादी क्र. १ हिचा मुलगी म्हणून निम्मा हिस्सा आहे. साक्षीदार पुन्हाहून सांगतो की, त्या मिळकतींमध्ये मारुती गार्डे यांचा एकटयाचाच हिस्सा होता. त्याबाबत मी माझ्या जबाबात स्पष्टीकरण दिलेले नाही. तसे स्पष्टीकरण द्यायला मला कोणतीही अडचण नव्हती. स्पेशल दिवाणी मुकदमा क्र. ४०/२०१७ मध्ये मारुती गार्डे यांचे विधिज्ञ श्री. ए. के. शिंदे होते. हे म्हणणे खरे आहे की, कथित मृत्यूपत्राप्रमाणे ग्रामपंचायत रेकॉर्डला तसेच सातबारा उता-याला आमच्या नावाने नोंद झाली नाही. तश्या नोंदी होण्याबाबत संबंधीत ग्रामपंचायतीला तसेच महसूल विभागाला मी विधिज्ञांमार्फत अर्ज केला होता. हे म्हणणे खरे नाही की, कथीत मृत्यूपत्र कायदेशीर नसल्याने त्या आधारे नोंदी करता येणार नाही असे संबंधीत विभागाने आम्हाला कळविले होते. साक्षीदार पुन्हाहून सांगतो की, मृत्यूपत्राबाबत प्रकरण न्यायप्रविष्ठ असलेने तशा नोंदी झाल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी संबंधीत विभागाला तसा अर्ज केला त्यावेळी कथित मृत्यूपत्राबाबत कोणतेही प्रकरण न्यायप्रविष्ठ नव्हते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की दिवाणी मुकदमा क्र. २०/८८ सुरु होते.

***न्यायालयीन वेळ संपल्यामुळे प्रकरण उलटतपासाकरीता तहकूब.***

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.04.05 12:38:41 +0530

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- २७/०३/२०२५

सह दिवाणी न्यायाधीशे क.स्तर, वाई.